**ठळक बातम्या**

- नीट फेरपरीक्षेसाठी पेपरचा कालावधी १५ मिनिटांनी वाढवला
- अमेरिकेबरोबर कराराविषयी अंतिम निर्णय झाला नसल्याचं इराणकडून स्पष्ट
- दक्षिण कोरियाचे माजी अध्यक्ष युन सुक येओल यांना ३० वर्ष तुरुंगवासाची शिक्षा
- राज्यसभा निवडणुकीत उमेदवारी अर्ज रद्द ठरवल्याच्या विरोधात काँग्रेसच्या मीनाक्षी नटराजन यांची याचिका सर्वोच्च न्यायालयानं फेटाळली
- प्रसिद्ध नेमबाजी प्रशिक्षक आणि आशियाई क्रीडा स्पर्धेतले सुवर्णपदक विजेते जसपाल राणा यांचं निधन

**आणि**

- महिला क्रिकेट टी-ट्वेंटी विश्वचषक स्पर्धेला आजपासून सुरुवात

<><><><><>

येत्या २१ जून रोजी होणाऱ्या नीट युजी फेरपरीक्षेचा कालावधी १५ मिनिटांनी वाढवण्यात आला आहे. ही परीक्षा सुरक्षित आणि गैरप्रकारमुक्त वातावरणात व्हावी याकरता राष्ट्रीय चाचणी संस्थेनं माजी परीक्षार्थींकडून सूचना घेऊन विविध उपाययोजना केल्या आहेत. त्यानुसार आता परीक्षेचा कालावधी १९५ मिनिटांचा केला असून ती दुपारी २ ते संध्याकाळी सव्वा पाच या वेळेत होईल. विद्यार्थ्यांची हजेरी पत्रकावर सही करणं, ओळखपत्र आणि इतर दस्तऐवजांची छाननी करणं या कामांसाठीचा वेळ त्यात अंतर्भूत राहील. त्याचप्रमाणे कच्च्या कामासाठी प्रश्नपत्रिकेत वाढीव जागा दिली आहे.

कॅबिनेट सचीव डॉ. टी. व्ही. सोमनाथन यांनी आज नीट फेरपरीक्षेच्या तयारीचा आढावा घेतला. ही परीक्षा सुरळीत, पारदर्शी, आणि सुरक्षित रित्या पार

पडावी यासाठी सर्व संबंधितांनी योग्य समन्वय राखून काम करावं अशा सूचना त्यांनी दिल्या.

**<><><><><>**

अमेरिकेबरोबर कराराविषयी अद्याप अंतिम निर्णय घेतलेला नाही असं इराणनं स्पष्ट केलं आहे. युद्ध थांबवण्याच्या दृष्टीनं वाटाघाटी अंतिम टप्प्यात आल्या असल्यानं इराणवर हल्ला करणार नाही असं अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी काल जाहीर केलं होतं. त्यावर इराणने ही प्रतिक्रीया दिली आहे. इराणच्या परराष्ट्रव्यवहारमंत्रालयाचे प्रवक्ते इस्माईल बाघेई यांनी सांगितलं की तह अंतिम टप्प्यात आल्याचं किंवा  करारावर सह्या होणार असल्याचं  आताच म्हणता येणार नाही. मात्र वाटाघाटींपैकी बराचसा मजकूर  मसुदा स्वरुपात तयार झाल्याचं त्यांनी मान्य केलं. युरेनियम उत्खनन आणि इतर धोरणआत्मक मुद्द्यांवर इराण ठाम आहे.

अमेरिकेनं हल्ले न करण्याचं ठरवलं असलं तरी होर्मुझची सामुद्रधुनी आणि आसपासच्या परिसरात अद्याप तणाव कायम आहे.

**<><><><><>**

दक्षिण कोरियाचे माजी राष्ट्रप्रमुख युन सुक येओल यांना आज सेऊल न्यायालयानं ३० वर्षांची तुरुंगवासाची शिक्षा ठोठावली आहे. शत्रुला सहाय्य करुन सत्तास्थाचा गैरवापर केल्याचा आरोप त्यांच्यावर होता. उत्तर कोरियात ड्रोन पाठवून दोन्ही देशांमधला तणाव वाढवणे  आणि त्याचा वापर करुन  मार्शल लॉ घोषित करणे या २०२४मधल्या घटनांमध्ये त्यांना न्यायालयाने  दोषी ठरवले आहे.   गुप्तचर विभागाचे माजी प्रमुख इन-ह्युंग यांनाही १५ वर्षांची तर माजी ड्रोन ऑपरेशन्स मुख्यालय प्रमुख किम युंग देई यांना तीन वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा झाली आहे.

**<><><><><>**

राज्यसभेच्या निवडणुकीत मध्यप्रदेशातून अर्ज दाखल करणाऱ्या काँग्रेस उमेदवार मीनाक्षी नटराजन यांची याचिका सर्वोच्च न्यायालयानं फेटाळली आहे. निवडणूक

निर्णय अधिकाऱ्यांनी दिलेल्या निर्णयात सर्वोच्च न्यायालयाला हस्तक्षेप करता येणार नाही, त्याकरता अर्जदारानं निवडणूक आयोगाकडे जावं, असं न्यायमूर्ती प्रशांतकुमार मिश्रा आणि न्यायमूर्ती ए एस चांदुरकर यांच्या पीठानं सांगितलं.

मीनाक्षी नटराजन यांनी तेलंगणात त्यांच्याविरुद्ध दाखल खटल्याची माहिती अर्ज करताना दिली नव्हती असा आक्षेप मध्य प्रदेश भाजपानं घेतला होता. तो ग्राह्य मानून निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी नटराजन यांचा उमेदवारी अर्ज रद्दबातल ठरवला होता. या निर्णयाला नटराजन यांनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिलं होतं.

**<><><><>**

मेघालय मधून राज्यसभेसाठी नॅशनल पीपल्स पार्टीचे उमेदवार जेम्स संगमा यांची बिनविरोध निवड झाली आहे. या निवडणुकीसाठी इतर कोणाचाही अर्ज आला नाही, त्यामुळे निवडणूक निर्णय अधिकारी माल्थस संगम यांनी जेम्स यांना बिनविरोध निवड झाल्याचं प्रमाणपत्र सुपूर्द केलं.

कर्नाटकातून काँग्रेसचे मल्लिकार्जुन खरगे आणि पवन खेडा यांची राज्यसभेवर बिनविरोध निवड झाली आहे.

**<><><><>**

ब्रिक्स देशांच्या शहरीकरणाच्या १३ व्या परिषदेचा आज नवी दिल्लीत समारोप झाला. गेल्या दोन दिवस चाललेल्या या परिषदेत ब्रिक्स देशांमध्ये लोकांच्या गरजांचा विचार करुन सर्वसमावेशक, शाश्वत आणि नागरिकांच्या गरजेनुसार शहरांची निर्मिती करण्यावर विचारविनिमय करण्यात आला. लोकांसाठी शहरं ही या परिषदेची संकल्पना होती. या परिषदेसाठी ब्राझिल, चीन, इथोपिया, इंडोनेशिया, इराण, रशिया, दक्षिण अफ्रिका आणि संयुक्त अरब अमिरातीचे प्रतिनिधी उपस्थित होते.

**<><><><>**

भारताचे प्रसिद्ध नेमबाजी प्रशिक्षक आणि आशियाई क्रीडा स्पर्धेतले सुवर्णपदक विजेते जसपाल राणा यांचं काल निधन झालं. ते ४९ वर्षांचे होते. जर्मनीत झालेल्या आय एस एस एफ नेमबाजी विश्वचषक स्पर्धेनंतर ते आजारी पडले होते. त्यामुळे त्यांना उपचारासाठी दिल्लीतल्या एका रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. काल रात्री त्यांनी अखेरचा श्वास घेतला. २०२४च्या ऑलिंपिक स्पर्धेत भारताची प्रसिद्ध नेमबाज मनु भाकर हिला त्यांनी मार्गदर्शन केलं होतं. या स्पर्धेत तिने २ कांस्य पदकं जिंकली होती.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी राणा यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे. खेळाडू म्हणून पदकांची लयलूट केल्यानंतर प्रशिक्षक म्हणून अनेक तरुण खेळाडू घडवण्यातही त्यांनी अमूल्य योगदान दिल्याचं त्यांनी शोकसंदेशात म्हटलं आहे. उत्कृष्टतेचा ध्यास, शिस्त आणि सेवाभाव यांवरच्या निष्ठेमुळे जसपाल राणा यांनी देशाला नेमबाजीत अढळ स्थान मिळवून दिलं होतं, असं सांगत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दुःख व्यक्त केलं. संरक्षण मंत्री राजनाथ सिंग, लोकसभेचे सभापती ओम बिर्ला, केंद्रीय क्रीडा मंत्री मनसुख मांडवीय, केंद्रीय आरोग्य मंत्री जगत प्रकाश नड्डा यांनीही राणा यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे.

**<><><><><>**

महिलांच्या टीट्वेंटी विश्वचषक क्रिकेट स्पर्धेला आजपासून इंग्लंडमध्ये सुरुवात होत आहे. उद्घाटनाचा सामना इंग्लंड आणि श्रीलंका यांच्यात बर्मिंगहॅम इथं रंगणार आहे. भारतीय वेळेनुसार रात्री ११ वाजता सामना सुरु होईल.

यंदा प्रथमच स्पर्धेत १२ संघ सहभागी होत आहेत. भारतीय संघाचा पहिला सामना येत्या रविवारी बर्मिंगहॅम इथं पाकिस्तानशी होणार आहे. हरमनप्रीत कौरकडे कर्णधारपद आहे.

**<><><><><>**

फिफा विश्वचषक फुटबॉल स्पर्धेत आज ब गटात, यजमान कॅनडाचा सामना बोसनिया आणि हर्झेगोविना यांच्या बरोबर होणार आहे. टोरांटो स्टेडियमवर भारतीय प्रमाण वेळेनुसार हा सामना मध्यरात्री साडेबारा वाजता सुरु होणार आहे. आज झालेल्या गट अ च्या सामन्यात दक्षिण कोरियानं झेक प्रजासत्ताकचा २-१ असा पराभव केला. या आधी काल झालेल्या उद्घघाटनाच्या लढतीत मेक्सिकोनं दक्षिण अफ्रिकेचा २-० असा पराभव केला.

**<><><><>**

टर्की मध्ये सुरू असलेल्या तिरंदाजी विश्वचषक स्पर्धेत, मिश्र दुहेरी गटात, भारताच्या बी. धीरज आणि कुमकुम मोहोड यांनी अंतिम फेरीत प्रवेश करत भारतासाठी पदक निश्चित केलं आहे. १४ जून रोजी होणाऱ्या अंतिम फेरीत, या जोडीचा सामना कोरियाच्या किम जे देओक आणि ओह ये जिन यांच्याशी होणार आहे.

**<><><><>**

प्रधानमंत्रीपदी नरेंद्र मोदी यांची कारकिर्द सर्वात जास्त कालावधीची आणि देशाची सर्वांगीण प्रगती साधणारी ठरल्याचं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी केलं आहे. ते आज मुंबईत वार्ताहर परिषदेत बोलत होते. सुशासन आणि सक्षम प्रशासन हे मोदी यांच्या सत्ताकाळाचं मुख्य बलस्थान आहे, असं ते म्हणाले.

**- - - होल्ड - मुख्यमंत्री - - -**

**<><><><>**

मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समध्ये आज दिवसअखेर १ हजार ६९५ अकांची वाढ झाली आणि तो ७५ हजार ५२८अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही ४६१ अंकांची वाढ नोंदवत २३ हजार ६२३ अंकावर बंद झाला.

**<><><><>**

एकोणिसाव्या मिफ अर्थात मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाविषयी एनएफडीसी अर्थात राष्ट्रीय चित्रपट विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक प्रकाश मगदूम यांनी आज मुंबईत वार्ताहर परिषदेत माहिती दिली. येत्या १५ ते २१ जून दरम्यान होणाऱ्या या महोत्सवाचा उद्घाटन सोहळा प्रभादेवी इथं रवींद्र नाट्य मंदिरात होणार आहे. या चित्रपट महोत्सवात ४७ देशांमधले एकूण १४४ चित्रपट दाखवले जाणार आहेत.

//<><><><><>//